# 1 शिवकालीन ग्रामीण व्यवस्था

प्रस्तावना –

भारत हा खेड्यांचा व त्या खेड्यामध्ये राहणाऱ्या शेतकऱ्याचा देश होता व आजही आहे. खेड्यातील बहुतेक लोकांचा व्यवसाय हा शेती असल्याने लोक त्यावरच अवलंबून होते. स्वराज्याच्या काळात ही समाज खेड्यातूनच वास्तव्य करीत होता. आताच्यासारखी मोठमोठी शहरे त्या काळात नव्हती. थोडक्यात शिवकालातील ग्रामीण समाज म्हणजे खेड्यातील ग्रामीण समाज आणि समाजाची रचना आणि सामाजिक व आर्थिक व्यवहार म्हणजे शिवकालीन गावगाडा होय.

शिवकालीन खेडे / गाव :-

खेड्याची निर्मिती कशी झाली हे निश्चितपणे सांगता येत नाही. समाजातील काही साहसी लोकांनी एकत्र येऊन गावाची निर्मिती केली असावी. गाव किंवा खेडे म्हणजे अशी लोकवस्ती की जिच्याभोवती शेती करण्यास योग्य अशी जमीन आहे व जिथे बहुसंख्य लोक शेतकरी व शेतावर आधारलेले व्यवसाय करणारे आहेत.

गावाच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या क्षेत्रफळाचे प्रामुख्याने दोन विभाग केले जात. पहिला वसाहतीची जागा अथवा पांढरी आणि दुसरा विभाग म्हणजे लागवडीची जागा अथवा काळी आई. अशा गावांना शिवकाळात ग्राम, देहे, मौजा किंवा ग्राम इत्यादी नावाने ओळखले जाई. काळाच्या ओघात गावाची लोकसंख्या वाढल्याने वस्ती वाढत असे. आणि त्याचे दुसऱ्या गावामध्ये रूपांतर होत असे. नवीन तयार झालेल्या वस्त्यांना मजरा अथवा वाडी असे म्हणत.

काही गावांच्या शेजारीच एखादी वस्ती वाढत जाते आणि तिचे रूपांतर एका गावामध्ये होते. तेव्हा दोन गावे तयार होतात. अशा दोन गावांचे वेगळेपण दाखविण्यासाठी मुळच्या मोठ्या गावास बुद्रुक म्हटले जाई व नव्या गावास खुर्द म्हटले जाई. बुद्रुक म्हणजे मोठे आणि खुर्द म्हणजे लहान.

शिवकाळातील लहान गावांना मौजे म्हटले जाई. 10 ते 12 मौजेमध्ये एखादे मोठे गाव असे. त्यास कसबा असे म्हटले जाई. कसबाच्या ठिकाणी कसबी कारागीर, व्यापार-उदीम करणारे लोक राहत असत. कसबाच्या ठिकाणी आठवडी बाजार भरत असे. काही कसब्यात बाजारहाट म्हणजे आर्थिक उलाढालीचा व्यवहार वाढत जावून त्याचे पेठेत रूपांतर होई.

Scanned by CamScanner

# शिवकालीन ग्रामव्यवस्थेतील प्रमुख वतनदार :-

1) **वतन :-**

वतन हा अरबी भाषेतील शब्द असून त्याचा अर्थ आपला देश, आपली जमीन असा आहे. इस्लामी राजवटीत हा शब्द आपल्या भाषेत रूढ झाला.

सरकारकडून गावच्या अधिकाऱ्याला त्याच्या चाकरीच्या मोबदल्यात जी जमिनीची देणगी मिळे त्याला वतन असे म्हणत. वतन वंशपरंपरागत पद्धतीचे होते.

* **वतनदार :-**

शिवकाळात वतनदार हे एक प्रकारचे ग्रामअधिकारीच होते. गावचा कारभार कार्यक्षमतेने चालविण्यासाठी त्यांची निर्मिती केली गेली. या वतनदारांची चौकट भक्कम होती. पाटील, कुलकर्णी, चौगुला, शेटे, महाजन, देशमुख - देशपांडे हे गावातील प्रमुख वतनदार होते. या वतनदारांचे पालनपोषण सर्व गावाकडून होत होते. वतनदार गावाची जी सेवा करीत त्याच्या मोबदल्यात त्यांना गावकऱ्यांकडून रोख रक्कम, वस्तू, प्राप्त होत. हक्क म्हणजे वतनदारास हक्काने मिळणारी बाब तर लाजीमा म्हणजे वतनदारास ऐच्छिक स्वरूपात मिळणारी बाब होय. प्रत्येक वतनदाराचे हक्कदागिने वेगवेगळे असत.

गावाच्या स्थैर्यासाठी आणि विकासासाठी सुनियंत्रित अशी वतन संस्था मध्ययुगातील एक महत्वाची संस्था होती. गावातील प्रमुख वतनदार त्यांचे कार्य व हक्कलाजीमे पुढीलप्रमाणे.

1) **पाटील :-**

हा मराठाकालीन ग्रामसंस्थेतील महत्वाचा वतनदार होता. त्याला गावचा राजा म्हटले तरी ... होवू नये. शिवकाळातील कागदपत्रात पाटलाचा उल्लेख, पाटील, गावपाटील, ग्रामणी, ग्रामप असा आढळतो. संपूर्ण गावाचे नेतृत्व करण्यासाठी जबाबदार पाटलांची असे. पाटील हे वतनदार गावामध्ये महत्वाचे होते. नावापूरता विचार केल्यास गावचे सर्व मुलकी व दिवाणी अधिकार यांच्याकडे असत. अशा या वतनदाराचे कार्य पुढीलप्रमाणे.

1) गावातील पडीक जमीन लागवडीखाली करणे.

2) जमिनीतून मिळणारा महसूल निश्चित करून तो शेतकऱ्यांकडून वसूल करणे.

3) रयतेची हक्क, चाकरी, महसुलातील सूट, महसूल तहकुबी इत्यादी विषयी सरकार दरबारी दाद मागणे.
4) संपूर्ण गावाच्या संरक्षणाची व्यवस्था करणे.
5) गावात घडणाऱ्या गुन्ह्याच्या तपास करून गुन्हेगारात शिक्षा करणे.
6) गावातील तंट्यांचा निकाल देणे.

पाटलास गावाच्या सेवा - चाकरीबद्दल इनामी जमीन अनेक प्रकारचे हक्कलाजीने व मानपानाच्या बाबी मिळत असत.

2) कुलकर्णी :-

हा गावातील दुसरा महत्वाचा अधिकार होता. गावातील पाटलाच्या खालोखाल याचे स्थान होते. गावातील पाटील हा बहुधा निरक्षर असल्याने गावाचा हिशेब ठेवण्याचे काम कुलकर्णी करीत आहे.
कार्ये 1) खेडेगावच्या जमिनींचा हिशेब ठेवणे.
2) गावातील प्रत्येक व्यक्तीच्या नावावर असलेल्या जमिनींचा व महसुलाचा जमाखर्च ठेवणे.
3) गावचा सरकारदरबारी होणारा पत्रव्यवहार करणे.
4) शेजारच्या गावात कुलकर्णी नसेल तर त्या गावचा हिशेब ठेवणे.
5) एखाद्या गावातील पाटील अकार्यक्षम असेल तर गावच्या ग्रामसभेचे नेतृत्व करणे.

अधिकार :-

गावातील पाटलाप्रमाणेच कुलकर्णीस काही हक्क होते परंतु ते पाटलांपेक्षा कमी होते. इनामी जमीन व गावातील लोकांकडून मानपान मिळत असे. गावच्या महसूल पैकी काही हिस्सा त्याला मिळत असे. दफ्तर खर्चासाठी सादीलवार म्हणून काही रोख रक्कम सरकारकडून मिळत असे. तसेच शेतकऱ्याकडून काही भेटवस्तू देखील मिळत.

चौगुला :-

ग्रामव्यवस्थेतील तिसरा महत्वाचा अधिकारी चौगुला हा होता. राज्यव्यवहार कोश या ग्रंथात चौगुला यांना उल्लेख ग्रामणी असा केलेला आहे. मूळ शब्द चौगुला म्हणजे चार कुळे सांभाळणारा असा चौगुला हा वतनदार होता. पाटलाच्या गावकीच्या कार्यातील मदतनीस म्हणून चौगुला त्याला ओळखले जात असे. महसूल

वसूलीच्या बाबतीत पाटलाला यांची भरपूर मदत होत असे. गावातून निघून गेलेल्या गावकऱ्यांना गावात परत आणणे हे त्यांचे मुख्य कार्य होते.

कार्य -

1) गावातून गोळा झालेल्या महसूल परगण्याच्या मुख्य कचेरीतील खजिन्यात नेऊन भरणे.
2) गावाची कोठारे धान्याच्या पेण यांची व्यवस्था ठेवणे.
3) गावाचा महसूल वसूल करण्यात पाटलाला मदत करणे.
4) वस्तूच्या रूपाने जमा झालेला महसूल सुरक्षित ठेवणे.

4) शेटे महाजन :-

शेटे महाजन हे शिवकालीन गावकऱ्यात आर्थिक व्यवहाराशी संबंधीत असे वतनदार होते. कसब्यासारख्या मोठ्या गावात बाजारपेठ बसविण्याचे काम यांना करावे लागत असे. या कामासाठी सरकारकडून या वतनदारांना वतन, जमीन, रोख रक्कम व काही हक्क मिळत असत. गावची वसाहत जशी पाटील बसावित असे तसे हे वतनदार पेठेची वसाहत बसविण्याचे काम करत. शे गावगाड्यातील सावकारीचे व्यवहार मुख्यत शेटे-महाजनाकडून केले जात. यांची निशाणी तराजू होती.

5) मिरासदार :-

गावातील ज्या व्यक्तीकडे स्वत: मालकीची जमीन असे व जे त्या जमिनीचा सारा सरकारला भरत असत त्यांना गावात मिरासदार असे म्हणत. गावातील जमीन लागवडीखाली आणण्याचे काम या वर्गाला करावे लागत असे. मिरासदार हा वर्ग जमिनीची लागवड वंशपरंपरागत पद्धतीने करीत असत. गावातील एकूण जमिनीपैकी 70 ते 80 %. जमीन या वर्गाच्या मालकीची होती. खेडेगावात वसाहत करणे. जमिनी लागवडीखाली आणणे अशी विविध कामे मिरासदार लोकांना करावी लागत असत.

6) उपरी :-

गावामध्ये स्वत:च्या मालकीची काहीच जमीन नसणारे व उदरनिर्वाहासाठी दुसऱ्याच्या शेतावर काम करणाऱ्या मजुरांना उपरी

असे म्हणत. दुसऱ्या कोणत्याही गावातून येणारे लोक म्हणत. उपरे समजले जात असत. सामाजिकदृष्ट्या या वर्गाला गावातील कोणत्याही गावसभेच्या कार्यात कोणत्याही प्रकारे भाग घेण्याचा अधिकार नव्हता. उपरे यांना कायम परके मानले गेले. त्यामुळे ग्रामव्यवस्थेत या वर्गाला कोणतेही स्थान नव्हते.

7) बलुतेदार व अलुतेदार :-

खेडेगावात परंपरेने चालत आलेल्या वतनदारास अलुतेदार व बलुतेदार यांचा समावेश होत असे. गावाच्या विकासासाठी व स्वैर्यासाठी या वर्गाने महत्वाची कामगिरी केलेली आहे. जात व सामाजिक स्थान ओळखून प्रत्येक बलुतेदार व ग्रामीण प्रशासनात महत्वाची कामगिरी बजावत होता. गावकऱ्यांकडून कामाचा मोबदला म्हणून या वर्गाला सुगीच्या दिवसात एकूण पिकांपैकी एक ठराविक हिस्सा दिला जात असे. या हिस्याला बलुता असे म्हणत. गावकऱ्यांकडून मिळालेल्या बलुत्याच्या मोबदल्यात संबंध वर्षभर या वर्गाला त्या शेतकऱ्यांच्या कामात मदत करावी लागत असे.

मराठ्यांच्या इतिहासकार ग्रँड डफने महाराष्ट्रात 12 बलुतेदार व 12 अलुतेदार असल्याचे संदर्भ आपल्या ग्रंथात दिले आहेत. या अलुतेदार व बलुतेदारांच्या मदतीनेच गावगाडा सुटकीत चालत असे.

## शिवकालीन कृषी व्यवस्था

1) शिवकाल जमिनीचे विभाजन :-

शिवकालीन गावाच्या जमिनीचे दोन भागात वर्गीकरण केले जात असे.

1) पांढरी :-

गावची वसाहत ज्या पांढऱ्या मातीच्या ठिकाणी होई त्याला पांढरी असे म्हटले जात असे.

2) काळी :-

ज्या ठिकाणी प्रत्यक्ष शेती केली जाई त्याला काळी आई असे म्हटले जाई. काळ्या आईचे प्रामुख्याने दोन भाग होते.

Scanned by CamScanner

GoodLuck Page No.
Date

i) प्रत्यक्ष लागवडीखाली असणारी जमीन. ii) नापीक, पडिक किंवा वांजट जमीन :- नापीक जमीनीच्या वापर गावकरी गुरेढोरांना चरण्यासाठी, यात्रांसाठी अथवा बाजार भरण्यासाठी करीत असत. ही जमीन लागवडीखाली आणण्याचे नेहमी प्रयत्न केले जात.

वरील सर्व जमीनीची मालकी ही राजाची मालकी ही राजाची असली तरी ती जमीन कसण्याचे काम राजा स्वतः करु शकत नसे. जमीन कसण्यासाठी त्या जमीनीचे मालकी हक्क राजा गावकऱ्यांना देई व त्याच्या मोबदल्यात शेतकरी त्या जमीनीचा खंड म्हणजे शेतसारा सरकारला देत. काही जमीन इनाम म्हणून सरकार वतनदारांना व धार्मिक संस्थांना देई. इनाम दिलेल्या जमीनीवर सारा माफी असे.

2) शेतजमीनीच्या इनामांचे प्रकार :-

गावातील जमीनीच्या एकुण 20%. जमीन ही इनामाच्या रूपाने दिली जात असे. काही विशिष्ट कामगिरी बद्दल अगर वतनांच्या सेवेबद्दल सरकारकडुन जमीन अथवा गाव इनाम मिळत असे. पवित्र धार्मिक स्थळांना, सत्पुरुषांच्या समाध्यांनाही सरकारकडुन इनामे बहाल केली जात असत. इनामांचे काही प्रकार पुढीलप्रमाणे :-

A) सनदी अथवा दिवाणनिसबत इनाम :-

सरकारकडुन दिल्या जाणाऱ्या इनामास सनदी अथवा दिवाणनिसबत असे म्हणत. अशा इनामांना दिलेल्या संपूर्ण जमीनीचा सारा माफ केला जात असे. हि इनामे संख्येने जास्त होती.

b) गावनिसबत इनाम :-

संपूर्ण गावकरी एकत्र येवुन गावाची काही ठराविक जमीन एखाद्या व्यक्तीस इनाम देत अशा इनामांची संख्या कमी होती.

c) धर्मादाय इनाम :-

17 व्या शतकात धर्माचे जीवनात विशेष स्थान होते. त्यामुळेच धर्माचे आचरण करणाऱ्या व्यक्तींना गावची काही जमीन इनाम दिली जाई. मठ, मशीदी, मंदिरे, समाध्या यांना ही इनामे दिली जात. इनाम जमीनीच्या उत्पन्नातून या धर्मस्थळांची व्यवस्था सुरळीत चालावी

Scanned by CamScanner

हि त्यामागील भूमिका होती. छ. शिवाजी महाराजांनी अशी अनेक धर्मादाय इनामे दिली होती. उदा. आळंदीची, ज्ञानेश्वर समाधी, इंद्रपुरच्या काजी बाबाजीची मशीद, रामदास स्वामींच्या चाफळचा मठ, पारगावच्या मौनी महाराजांची समाधी. सासवडची सोपान देवांची समाधी इत्यादी.

d) अग्रहार इनाम :-

काही वेळा ब्राह्मवृंदास प्रयत्न होवून सरकारकडून एखादे संपूर्ण गावच इनाम दिले जाई. त्यास अग्रहार इनाम असे म्हटले जाई. या इनामात त्या गावाचे संपूर्ण महसुली उत्पन्न त्या ब्राह्मवृंदास मिळत असे.

e) वतनी इनाम :-

गावगाड्यातील पाटलापासून देशमुखपर्यंतच्या लहान-मोठ्या वतनदारांना इनामी जमिनी दिलेल्या असत. अशा वतनी इनाम म्हटले जाई. लहान - मोठ्या बलुतेदारांनाही ~~इनामी~~ इनामी जमिन असत.

f) दुधमात / साडीचोळी इनामी :-

काही प्रसंगी राजा आपल्या मुलीस इनाम देत असे. अशा वेळी त्या इनामास दुधमाताचे अथवा साडीचोळीचे इनाम संबोधले जाई. राज्याची विशेष सेवा करणाऱ्या व्यक्तीस अथवा लढाईत पराक्रम गाजविणाऱ्या शूर पुरुषास जमिनीचे अथवा गावाचे इनाम दिले जाई. हि इनामे वंशपरंपरागत असत.

3) शिवकालीन रयत (शेतकरी) त्यांचे जीवन :-

17 व्या शतकात महाराष्ट्राचे आर्थिक जीवन शेती व्यवसायाशी निगडीत होते. उद्योगधंदे, व्यापार, इतर, व्यवसायांना दुय्यम स्थान होते. शेती व्यवसाय हा जीवनाचा एकमेव मार्ग असल्याने महाराष्ट्रात जमिनीला काळी आई असे म्हणत. शेतीच्या उत्पादनावर गावचे अधिकारी, मिरासदार, बलुतेदार व इतर यांचे जीवन अवलंबून असे.

शिवकाळात शेतकऱ्यास रयत, कुणबी, कुळवाडी अशा विविध नावाने संबोधले जाई. वतनदार मंडळी प्रत्यक्ष शेतावर काम करीत नसत. शेतावर प्रत्यक्ष राबणारा रयत हाच खरा शेतीचा आधार होता. शेती व्यवसाय हा महत्वाचा असल्यामुळे सरकारसुद्धा रयतेच्या प्रश्नाविषयी जागरूक होते. 17 व्या शतकात महाराष्ट्रात विविध राजकीय घडामोडी घडत होत्या आणि

Scanned by CamScanner

आणि स्वाभावीक त्याचे पडसाद शेतकऱ्याच्या जीवनावर आणि शेती व्यवसायावर पडत असे. पावसाची अनिश्चीतता नेहमीचा युद्धाचा प्रसंग, आर्थीक मदतीचा अभाव, असह्य राज्यकारभार इत्यादी कारणांमुळे महाराष्ट्रातील शेती व शेतकरी मांगासलेल्या अवस्थेत होते.

महाराष्ट्रातील विविध प्रदेशात विविध प्रकारची व प्रतीची माजमीन होती. कोकण-भात खरे. सह्याद्रिची डोंगराळ जमीन, माळ्यान सपाटिवरील काळी जमीन, नद्यांच्या काठवरील सुपीक जमीन असे अनेक प्रकार होते. महाराष्ट्रात अव्वल प्रतीची जमीन फार कमी होती.

शिवकाळातील शेती ही निसर्गातील पर्जन्यसृष्टीवर अवलंबून होती. आजच्यासारखी मोठमोठी धरणे, कालवे व पाणी पुरवठ्याची साधने त्या काळी नव्हती. काही ठिकाणी ओढ्या द्वारे पाणीपुरवठा केला जाई: त्यास ~~पानरचळ~~ पाटस्थळ असे म्हणत. काही ठिकाणी विहिरीमार्फत बागायत शेती केली जाई त्यास मोटस्थळ असे म्हणत.

चांगली शेती करण्यासाठी मनुष्यबळाची गरज असे. संपूर्ण कुटुंब शेतीवर राबत असत. पण वारंवार पडणारे दुष्काळ, युद्ध, रोगराई यामुळे अनेक जण दगावत त्याचा फटका शेती व्यवसायाला बसत असे.

## 4) शिवकालीन जमीन, महसूल पद्धती :-

शिवकाळात सरकारला अनेक बाबीपासून कर (Tax) मिळत असे. पण यामध्ये जमिनीपासून मिळणारा महसूल सर्वाधिक महत्वाचा होता. कारण राज्याचे तेच खरे मुख्य उत्पन्न होते. जमिनीवर महसूल आकारणी करण्यापूर्वी त्या जमिनीची प्रतवारी करणे गरजेचे होते. यासाठी स्वराज्यातील जमिनीची अव्वल, इम, सीम व चारहत चा चार वर्गात वर्गीकरण करण्यात आले होते. तसेच महसूल आकारणी करण्यापूर्वी स्वराजातील जमिनीची मोजणी करण्यात आली होती.

जमिनीची मोजणी -

जमिनीची प्रतवारी केल्यानंतर त्या त्या प्रतवारीच्या जमिनीची मोजणी करण्यात आली. शेतीचे मोजमाप करण्यासाठी शिवशाही काठी हे साधन वापरण्यात आले. हि शिवशाही काठी पाच हात व पाच मुठी इतक्या लांबीची असे.

पाच हात व पाच मुठी यांनी बनलेल्या चौरस चौरस

काठ्यांचा मिळून एक पांड होई आणि वीस पांडांचा मिळून एक बीघा होई. एकशे वीस चौरस बीघे मिळून एक चावर होई.

जमीन मोजण्यासाठी शिवाजी महाराजांनी पुढील सूत्र अवलंबिले.

1) संबंधीत अधिकाऱ्यांनी प्रत्येक खेड्यात जावून एकुण जमीन जाणून त्यापैकी पिकाऊ किती आणि पडीक किती यांची नोंद करणे.

2) गावच्या जमिनीची विभागणी डोंगराळ, दलदलीची व काळी अशी विभागणी करावी.

3) जमीनीची प्रतवारी चार भागात करावी.

4) गावाचे उत्पन्न निश्चित झाल्यावर खरीप व रब्बी उत्पन्नाची नोंद करावी.

5) पूर्वीचे उत्पन्न, त्यातील वसूल झालेला महसूल सध्याचे पीक आणि त्याचे उत्पन्न याची तुलना करणे.

b) <u>रयतवारी पद्धत</u> :-

छ. शिवाजी महाराजांनी पूर्वीची जमीनदारी पद्धत रद्द केली. त्या जागी नविन रयतवारी पद्धत सुरु केली. रयतवारी पद्धतीप्रमाणे पिकाची पाहणी कोणत्याही व्यक्तीच्या मर्जीवर अवलंबून न राहता पिकाच्या स्थितीवर अवलंबून राहिले. त्यामुळे जनतेवर होणारा अन्याय, जुलूम कमी झाला. 2/5 पेक्षा कमी सारा भरण्याची रयतेला सवलत दिली. या पद्धतीमुळे रयतेला शांतता व समृद्धी प्राप्त झाली.

c) <u>जमिनीची वर्गवारी</u> :-

छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील जमिनीची पाहणी करुन आपल्या अधिकाऱ्याकडून मोजणी केली आणि त्या जमिनीची वर्गवारी केली.

a) लागवडीखालील जमीन
सरस, मध्यम, कनिष्ठ जमीन
- जिराईत, बागाईत

b) पडीक जमीन
- जंगल, वरकस जमीन.

d) <u>महसूल आकारणीचे तत्व</u> →

जमिनीची वर्गवारी करुन शिवाजी महाराजांनी महसूल निश्चिती केली. सर्व जमिनीवर 40%. कर घ्यावा. प्रत्येक पिकाला वेगवेगळा कर आकारला जाई. काळ्या जमिनीच्या प्रत्येक

बिघ्यास १ मन बागायती जमिनीच्या प्रत्येक बिघ्यास ५ मन सारा घेतला जाई. काही वेळा सारा रोख रकमेत घेतला जाई.

ब) महसूल आकारणीचे तत्त्वे →
जमिनीची वर्गवारी करून शिवाजी महाराजांनी महसूल निश्चिती केली. सर्व जमिनीवर

ब) महसूलाचे विभाग :-
संपूर्ण स्वराज्यातील महसूल वसुली चांगल्या रीतीने व्हावी व कोणत्याही स्थलेवर अन्याय होवू नये यासाठी शिवाजी महाराजांनी महसूल वसूल करण्यासाठी स्वराज्याचे तीन महसुली सर सुभ्याल वर्गीकरण केले. उत्तर विभाग, दक्षिण विभाग आणि पूर्व किनाऱ्यावरिल विभाग या तीन महसुली सुभ्याल विभागणी, परगणा तर्फ कर्यात यामध्ये केली. प्रत्येक सुभ्याल १ लाख महसूल जमा होत असे

महसूल अधिकारी :-
पूर्वीच्या राजवटीतील महसूल पध्दतीत अनेक सुधारणा करून शिवाजी महाराजांनी नवीन महसूल पध्दती अमलात आणली. त्यात खेडेगावातील, पाटील, कुलकर्णी तसेच सुभ्यांच्या ठिकाणचे देशमुख देशपांडे यांचे हक्क कमी केले. त्यांच्या जागी नवीन अधिकारी नेमले. सर्वांना रोख पगार देण्यास सुरवात केली. सर्व अधिकारी राजाला जबाबदार असत. महसूल वसूल करण्यासाठी तर्फ वर हवालदार असत. प्रांतावर-सुभेदार त्याच्या हाताखाली मुख्य देशाधिकार कारकुन असे. अनेक प्रांतावर एक सरसुभेदार असत. या सरसुभेदाराच्या हाताखाली आठ अधिकारी होते. त्यामध्ये दिवाण, मुजुमदार, फडणीस, सबनीस, कारखानीस, चिटणीस, जामदार, पोतनीस इ. अधिकारी होते.

वरिल सर्व मुद्याच्या आधारे विचार केल्यास असे स्पष्ट होते की. शिवकाळात शेती हेच महसूलाचे प्रमुख साधन होते. शिवाजी महाराजांच्या जमीन महसूलाची वैशिष्ट्ये म्हणजे जमीन मोजण्याच्या पध्दतीत सुधारणा, रयतवारी पध्दतीची सुरवात जमिनीची वर्गवारी करून कर आकारणी, महसूल गोळा करण्यासाठी महसूल अधिकारी पदाची निर्मिती हे होत.

Date

# शिवकालीन उद्योगधंदे व व्यापार.

## * शिवकालीन औद्योगिक व व्यापारी केंद्र →

छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केल्या-नंतर उद्योग आणि व्यापार यांना चालना देण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न सुरु केले. स्वराज्यात कसब्याच्या अथवा परगण्याच्या मुख्य ठिकाणी लहानसहान बाजारपेठ तयार झाल्या होत्या. तर सरकारने काही बाजारपेठा मुद्दाम प्रयत्न करुन वसविल्या होत्या. काही ठिकाणच्या बाजारपेठांमध्ये मोठ्या प्रमाणात देशांतर्गत आणि परदेशी मालांची आयात-निर्यात, खरेदी-विक्री होत असे. अशा मोठ्या बाजारपेठा कोकण किनार-पट्टीवरील बंदरात उदयास आल्या होत्या.

स्वराज्यात उदयास आलेल्या औद्योगिक व व्यापारी केंद्रांची माहिती पुढीलप्रमाणे :-

शिवकालीन व्यापारी व औद्योगिक केंद्राचे दोन गटात वर्गीकरण केले जाते.

A] समुद्र किनाऱ्यावरील औद्योगिक व व्यापारी केंद्रे.

B] अंतर्गत व्यापारी केंद्र

## A] समुद्र किनाऱ्यावरील औद्योगिक व व्यापारी केंद्रे.

मध्ययुगीन महाराष्ट्र बराच काळ मुसलमान सत्ताधीशांच्या ताब्यात होता. त्यानंतर तो मराठा सत्ताधीशांच्या ताब्यात आला. शिवकाळात कोकण प्रदेशाची समुद्र किनारपट्टी अतिशय उपयुक्त ठरली होती. याच किनारपट्टीच्या साहाय्याने शिवकाळातील व्यापारी केंद्रे विकसीत झाली होती. समुद्र किनाऱ्यावरील औद्योगिक व व्यापारी केंद्रे पुढीलप्रमाणे.

### 1] चौल :-

अलिबाग तालुक्यातील चौल बंदर शिवकाळात व्यापारीकरता भरभराटीला आलेले होते. इ.स. 1670 साली शिवाजी महाराजांनी हे बंदर जिंकले. डिसेंबर ते मार्च या कालावधीत येथील व्यापार तेजीत असे. मलबार-हून येणारी जहाजे या बंदरावर आसत. या जहाजातून ~~भासले~~, सुपा मसाले, सुपाऱ्या, नारळ, औषधे, तांबे इ. वस्तू येत. या वस्तूंना महाराष्ट्रात मोठी मागणी होती. मलबारहून आलेले व्यापारी या बंदरातून मोठ्या प्रमाणात कापड, गहु, धान्य, तलम कापड घेवून जात असत. महाराष्ट्र

Scanned by CamScanner

GoodLuck Page No.
Date

तील सूती कापड आणि यांच बंदरातून इराण व अरबस्थान या ठिकाणी जात असे.

2) दाभोळ :-

कोकण किनारपट्टीवरील हे एक भरभराटीला आलेले बंदर होते या बंदरातून ही मोठ्या प्रमाणात व्यापार होत असे. पूर्व आफ्रिका, इराण या देशांबरोबर दाभोळचे व्यापारी संबंध होते. खंबायत, दीव, मलबार या व्यापारी केंद्रातूनही तांबे, पारा, यांनी भरलेली जहाजे येथे येत असत.

3) कल्याण :-

17 व्या शतकात कल्याण हे दाट लोकवस्तीचे शहर होते. उत्तर हिंदुस्थान, गोवळकोंडा आणि केरळ येथून अनेक वस्तू मोठ्या प्रमाणावर व्यापाराच्या निमित्ताने येत असत.

4) भिवंडी :-

या ठिकाणी देखील व्यापार मोठ्या प्रमाणात चालत असे. विणकराचा धंदा येथे तेजीत होता. इंग्रज लोकांनी अनेक विणकरांना मुंबईला येण्याची विनंती केली होती. परंतु विणकराने इंग्रजांच्या या विनंतीस मान दिला नाही. विणकरांनी भिवंडी येथेच आपली वसाहत वसविली. जहाज बांधणीसाठी उपयुक्त असणारे दिवर जातीचे लाकूड येथे मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होते.

5) राजापूर :-

रत्नागिरी जिल्ह्यात असलेले राजापूर हे शिवकाळातील एक महत्वाचे व्यापारी केंद्र होते. इ.स. 1660 व 1662 या साली अनुक्रमे इंग्रज व फ्रेंच लोकांनी आपली वखार या ठिकाणी स्थापन केली होती. फ्रेंच व्यापारी या ठिकाणाहून शिसे व लोखंडाचा व्यापार करीत. या बंदरातून, मिरे, वेलदोडे, सूती कापड, मीठ, कागद या वस्तूंचा व्यापार चालत असे.

Scanned by CamScanner

6) वेंगुर्ले :-

17 व्या शतकात हे व्यापारी केंद्र भरभराटीस आले होते. या ठिकाणी डच लोकांनी आपली वखार स्थापन केली होती. 1660 च्या दरम्यान जपान, सिलोन, इराण, अरबस्थान येथून येणारी जहाजे भेट देत असत.

B) अंतर्गत व्यापारी केंद्र :- →

शिवकाळात स्वराज्यातील लोकांच्या ~~दैनीक~~ दैनंदिन गरजा भागविण्यासाठी अनेक छोटी मोठी व्यापारी केंद्रे विकसित झाली होती. छ. शिवाजी महाराजांनी जाणीवपूर्वक बाजारपेठा विकसित करण्यासाठी प्रयत्न केले होते. उदा. शिवापूर, जिजापूर इ. पंचक्रोशीतील आर्थिक उलाढाल अशा बाजारपेठांतूनच होत असे. कसबी गावांमध्ये अनेक बाजारपेठा महाराजांनी वसविल्या होत्या.

किल्ल्यावरील बाजारपेठा

शिवकाळात काही प्रमुख किल्ल्यावर वास्तव्य अधिकारी सैनिक व प्रजाजन यांची बरीच मोठी वस्ती असे. त्यांच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी शिवाजी महाराजांनी अशा किल्ल्यांवर भव्य बाजारपेठा बांधल्याचे दिसून येते.

उदा. रायगड किल्ल्यावर बांधलेली बाजारपेठ

समारोप -

वरील मुद्द्यांच्या आधारे असे स्पष्ट होते की शिवकाळात व्यापार व ~~उ~~ भरभराटीला आलेला होता. अनेक बंदरातून व्यापार चालत असे. शिवकाळात अंतर्गत व्यापारच भरभराटीला आला होता असे नसून परकीयांशी देखील व्यापार संबंध प्रस्थापित करण्यात शिवाजी महाराजांना यश मिळालेले होते. सागरी मार्गाने होणारा व्यापार हे शिवकालीन व्यापाराचे वैशिष्ट्ये मानले जाते. सागरी मार्गाप्रमाणेच अंतर्गत व्यापारी केंद्रे देखील महत्त्वाची होती. आठवडी बाजार कसबा किंवा पेठा यांना अंतर्गत व्यापारी केंद्रे म्हणून महत्त्वाचे स्थान होते.

Scanned by CamScanner

* शिवकालीन व्यापारी वस्तूंची उत्पादन केंद्रे :→

1) कापड - चोपड →

तत्कालीन व्यापारी वस्तूत विविध प्रकारचे कापड हा महत्वाची वस्तू होती. स्त्री-पुरुष विविध प्रकारची वस्त्रे वापरत. कापड तयार करणारी केंद्रे पुढीलप्रमाणे. पैठण, बुऱ्हाणपूर, नागपूर, सासवड ई. या ठिकाणी स्त्रियांसाठी विविध प्रकारचे कापड तयार केले जात असे.

* धोतर - सासवड, पुणे, दाभोळ ई.

* फेटे - केजपूर, कोरेगेरी, जालना, पैठण, जुन्नर

2) धातूच्या वस्तू →

तत्कालीन समाजात सोने, चांदी, तांबे, पितळ, आणि लोखंड या धातूपासून विविध प्रकारच्या नित्योपयोगी वस्तू तयार केल्या जात. सोने चांदीपासून निरनिराळ्या प्रकारची आभूषणे तयार होत. सोने आणि चांदीचा वापर नाणी पाडण्यासाठीही केला जाई. लोखंडाचा वापर लढाईतील आयुधे, तोफा, साखळदंड यांच्या उत्पादनासाठी होई. वरील धातूंच्या वस्तू शिवकाळात जवळपास प्रत्येक गावातून बनविली जात. विशेषत तत्कालीन शहरातून धातूंच्या वस्तू बनविल्या जात असत

3) मीठ - मच्छीमारी -

कोकण किनाऱ्यावरील दोन मोठे उद्योग म्हणजे मिठाचे उत्पादन व मच्छीमारी. शिवकाळात अनेक ठिकाणी मिठाचा उद्योग भरभराटीस आला होता. कोकणात तयार झालेले मीठ देशावर व अन्यत्र पाठवले जाई.

दुसरा उद्योग म्हणजे मच्छीमारीचा, भिवंडी, रोहा, पेण, पनवेल, नागोठाणे, कल्याण इत्यादी ठिकाणी हा उद्योग मोठ्या प्रमाणावर चालत असे. या ठिकाणी सुकविलेली विविध प्रकारची मासळी तयार होत असे

लाकूड काम :-

कोकणातील आणखी महत्वाचा उद्योग म्हणजे लाकूडकाम व जहाजबांधणी. कोकणात मोठ्या प्रमाणात सागाचे लाकुड मिळत असे. हे सागवान लाकुड चांगल्या टिकावू प्रतीचे असल्यामुळे ते प्रसिद्ध होते. या लाकडाचा उपयोग इमारतीसाठी व जहाज जहाजबांधणीसाठी होत असे. शिवकाळात कल्याण, भिवंडी, पनवेल, राजापूर, पनवेल देवगड, मालवण अशा अनेक बंदरातून जहाज बांधणीचा व दुरुस्तीचा मोठा उद्योग चालत असे.

Scanned by CamScanner